06 JUL 2021
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'एनएसएस'चा स्वयंसेवक आव्हानास तत्पर

## कुलगुरू डॉ. शिर्के; विद्यापीठात आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग भरीव कार्य करणारा, सामाजिक जबाबदारीचे भान लक्षात घेऊन काम करणारा विभाग आहे. एन.एस.एस.चा स्वयंसेवक हा संकटाशी सामना करण्यास, कोणतीही बिकट नैसर्गिक किंवा मानवी परिस्थितीस आव्हान देण्यास तत्पर असतो, असे प्रतिपादन कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना कक्ष व शिव सहायता आपत्ती व्यवस्थापन केंद्र यांच्या माध्यमातून आयोजित आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यशाळेत ते बोलत होते. कुलगुरु डॉ. शिर्के म्हणाले,

आपत्तीवेळी प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखायला हवी त्यामुळे आपत्तीशी मुकाबला करणे सोपे जाते. कार्यशाळेत शिवाजी विद्यापीठ प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, सांगली जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी रफिक नदाफ, व्हाईट आर्मीचे संस्थापक अशोक रोकडे यांनी मार्गदर्शन केले. राष्ट्रीय सेवा योजना संचालक प्रा. अभय जायभाये यांनी प्रस्ताविक केले.

डॉ. तातोबा बदामे यांनी सुत्रसंचलन केले. डॉ. एस. एन. गायकवाड यांनी आभार मानले. यावेळी डॉ. डी. जी. चिघळीकर, प्रा. सदाशिव मोरे, प्रा. रिना पाटील, प्रा. शिवाजी चव्हाण, प्रा. दीपक खेडकर आदी उपस्थित होते.

0 6 JUL 2024 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# यूजीसीकडून स्वयंम अध्ययनचे ऑनलाईन ४० अभ्यासक्रम

## शिवाजी विद्यापीठ अभ्यास मंडळाची मान्यता

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विद्यापीठ अनुदान आयोग (यूजीसी) ने सुरू केलेल्या मूक स्वयंम उपक्रमाच्या ४० अभ्यासक्रमांना शिवाजी विद्यापीठ अभ्यास मंडळाने पहिल्या सत्रासाठी मान्यता दिली आहे. चॉईस बेस्ड क्रेडिट सिस्टीममध्ये या विषयांचा समावेश असणार आहे.



विद्यापीठ अंतर्गत अधिविभाग व महाविद्यालयात तज्ज्ञ प्राध्यापक नसल्याने काही अभ्यासक्रम शिकवले जात नाहीत, असे ४० अभ्यासक्रम यूजीसीने संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने उपलब्ध करून दिले आहेत. मल्टिडिसिप्लीनरी, लॉ, कॉम्प्युटर सायन्स इंजिनिअरिंग, बायोलॉजिकल सायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी, शिक्षणशास्त्र, लायब्ररी अँड इन्फॉर्मेशन सायन्स, मॅनेजमेंट स्टडीज सोशल सायन्स, ॲग्रीकल्चर अँड फूड इंजिनिअरिंग, भाषा यासह ४० विषयांचा यात समावेश आहे.

कोर्सची माहिती, अभ्यासक्रम स्टडी मटेरियल यूजीसीच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. स्टडी मटेरियल संबंधित विषयातील तज्ज्ञांकडून तयार करून घेण्यात आले आहे. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन नोंदणी केल्यानंतर विद्यार्थ्यांना ते उपलब्ध करून दिले जाणार आहे. यासंदर्भातील माहिती विद्यापीठ, यूजीसीच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अभ्यासक्रमांचा विद्यार्थ्यांना तांत्रिक कौशल्य व संवाद कौशल्यासाठी उपयोग होणार असून, करिअरच्या संधी उपलब्ध होणार आहेत. अधिविभाग व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमास प्रवेश घ्यावा, असे आवाहन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 6 JUL 2021
पुढारी

# विद्यापीठ ऑनलाईन परीक्षेला ६ हजार ५०० विद्यार्थी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या पुनर्परीक्षेंतर्गत सोमवारी ७ हजार ५१३ पैकी ६ हजार ५६५ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षा दिली.

विद्यापीठाकडून पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांच्या परीक्षा ३० जूनपासून सुरू झाल्या आहेत. ५ जुलै रोजी बीए.,बी.कॉम.,बी.एस्सी., एम.ए., एम.कॉम.,बीबीए, बीसीए, एमसीए, एमएसडब्ल्यू, बी. व्होक, बी. टेक, बी.एस्सी., एम.एस्सी नॅनो सायन्स, एमबीए इन रूरल मॅनेजमेंट, जर्नालिझम अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या.

दरम्यान, विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल २०२१ मध्ये होणाऱ्या उन्हाळी सत्र परीक्षेसाठी अर्ज शुल्क भरण्याबाबतचे परिपत्रक विद्यापीठाने संकेतस्थळावर ठेवले आहे. उन्हाळी सत्राच्या ७३८ अभ्यासक्रमाच्या परीक्षा होणार आहेत. परीक्षा फॉर्म विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात जमा करणे, महाविद्यालयांनी ते विद्यापीठाकडे सादर करणे याबाबत वेळापत्रक जाहीर केले आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 6 JUL 2021

तरूण भारत

# युजीसीच्या ४० विषयांना अधिकार मंडळाची मान्यता

प्रतिनिधी
कोल्हापूर

विद्यापीठ अनुदान आयोग (युजीसी)ने सुरू केलेल्या स्वंयम अध्ययन ऑनलाईन ४० विषयांना शिवाजी विद्यापीठ अधिकार मंडळाने मान्यता दिली आहे. या अभ्यासक्रमांचा तांत्रिक कौशल्य व संवाद कौशल्यासाठी उपयोग होणार असून यामुळे करिअरच्या संधीदेखील मिळणार आहेत. त्याचबरोबर शिवाजी विद्यापीठाच्या 'चॉईस बेस्ड क्रेडिट सिस्टम'मध्ये या विषयांचा समावेश केला जाणार आहे. तरी जास्तीत विद्यार्थ्यांनी या अभ्यासक्रमाला प्रवेश घ्यावा, असे आवाहन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आवाहन केले आहे.

युजीसीने ४० अभ्यासक्रम आपल्या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध करून दिले आहेत. या अभ्यासक्रमांचे स्टडी मटेरियल युजीसीच्या संकेतस्थळावर



उपलब्ध आहे. त्यामुळे विद्यापीठ अंतर्गत अधिविभाग किंवा महाविद्यालयांनी हे अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना उपलब्ध करून द्यावेत. या अभ्यासक्रमात मल्टीडिसिप्लीन, लॉ, कॉम्प्युटर सायन्स इंजिनिअरिंग मल्टीडिसिप्लीन, बायोलॉजिकल सायन्स ॲन्ड बोटॅनिकल, शिक्षणशास्त्र, लायब्ररी ॲन्ड इनफर्मेशन सायन्स, मॅनेजमेंट स्टडीज ॲन्ड मल्टीडिसिप्लीन, ह्युमॅनिटीज बिझनेस, सोशल सायन्स, लॉ, ॲग्रीकल्चर ॲन्ड फूड इंजिनिअरिंग, भाषा, यासह अन्य ४० विषयांचा समावेश आहे. यासंदर्भातील सविस्तर माहिती शिवाजी विद्यापीठ आणि युजीसीच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 JUL 2021
तरूण भारत

# विद्यापीठ पुनर्परीक्षा सुरळीत

कोल्हापूर
शिवाजी विद्यापीठाच्या वतीने घेण्यात आलेल्या पुर्नपरीक्षा सुरळीत पार पडल्या. ७५१३ पैकी ६५६५ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षा दिल्या आहेत. यामध्ये बी. ए., बी. कॉम., बी. एस्सी., एम. ए., एम. कॉम., बी. बी. ए., बी. सी. ए., एम. सी. ए., एम. एस. डब्ल्यू., बी. टेक., बी. एस्सी., एम. एस्सी नॅनो सायन्स., एम. बी. ए. इन रूरल मॅनेजमेंट,, जर्नालिझम अभ्यासक्रमांचा समावेश आहे.

विद्यापीटाच्या वतीने एप्रिल–मार्च २०२१ मध्ये घेण्यात येणाऱ्या उन्हाळी परीक्षांचे शुल्कासह अर्ज भरण्यास प्रारंभ झाला आहे. याबाबतचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर झाले आहे. उन्हाळी सत्रात ७३८ अभ्यासक्रमाच्या परीक्षा होणार आहेत. विद्यार्थ्यांनी विहीत नमुन्यात शुल्कासह भरलेला अर्ज अधिविभाग किंवा महाविद्यालयात जमा करावयाचा आहे.